# श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

## परिचय :

स्पर्धेच्या युगामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी पदवी स्तरावर शिकत असतानाच स्पर्धेच्या युगामध्ये पाठीमागे राहू नये, यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्राची 2006 साली स्थापना करण्यात आली. 2014 साली या केंद्राचे नाव "कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र" असे करण्यात आले. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वतंत्र क्लासरूम, स्वतंत्र स्टडी रूम, संदर्भ ग्रंथ, विविध प्रकारची स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मासिके, मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे उपलब्ध करून दिली जातात. तसेच दरवर्षी या केंद्रामध्ये शंभर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि विषयनिहाय व्याख्यानाचे मार्गदर्शक करण्यात येते. दरवर्षी किमान घड्याळी 100 तासाची व्याख्याने आयोजित केली जातात. पोलीस भरती, बँकिंग, राज्यसेवा पूर्व परीक्षा आणि मुख्य परीक्षा, मुलाखत इत्यादीचे मार्गदर्शन केले जाते.

## उद्दिष्टे :

१) पदवी स्तरावर शिकत असतानाच विविध स्पर्धा परीक्षेची माहिती देणे.

२) मोफत व दर्जेदार मार्गदर्शन करणे.

३) स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधीची माहिती व उपलब्धता करून देणे.

४) निशुल्कामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून देणे.